# छत्रपती शिवरायांचे अष्टप्रधान मंडळ व प्रशासन



- पंतप्रधान • अमात्य • सचिव • मंत्री
- सेनापती • सुमंत • न्यायाधीश • पंडीतराव

डॉ.महादेव गव्हाणे

छत्रपती शिवरायांचे अष्टप्रधान मंडळ व प्रशासन
डॉ.महादेव गव्हाणे

आदर्श न्यायव्यवस्था, लोकशाही मुल्यांना महत्व, जनतेचा न्यायप्रक्रियेत सहभाग, मानवता धर्माचे पालन, सन्मानता व समानता, जात धर्मावर आधारित भेदभाव नाही, जनहित, केंद्रस्थानी भ्रष्टाचार विरहित यंत्रणा अशी वैशिष्ठ्यपूर्ण व्यवस्था असलेली अष्टप्रधान मंडळ ही प्रशासकीय व्यवस्था शिवरायांनी निर्माण केली. ती तत्कालीन काळाला अनुसरून होतीच. याशिवाय भविष्यकाळातल्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी या व्यवस्थेचा उपयोग होवू शकतो. शिवरायांचा राज्यकारभार सामान्य माणसाला समजेल अशा प्रकारचा होता. त्यामध्ये प्रजेला विश्वासात घेतलेले होते. प्रशासन, लष्कर, आरमार, किल्ले, महसूल यामध्ये राजांनी घालून दिलेल्या नियमाप्रमाणे काम चालत होते. लाभलेल्या अवघ्या ५० वर्षे वयाच्या कालखंडामध्ये मरगळलेल्या मराठी मनाला नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न राजांनी केला. तत्कालीन समाजातील राजकीय, सामाजीक, धार्मिक इत्यादी क्षेत्रातल्या जुन्या समजूती बाजूला ठेवल्या व कर्तृत्व शक्तीला चालना देणारी व्यवस्था उभी केली. प्रत्यक्ष राजधानी रायगड शत्रूच्या ताब्यामध्ये गेल्यानंतरही ज्या व्यवस्थेच्या जोरावर औरंगजेबाच्या आक्रमणाचा निकराने प्रतीकार मराठ्यांनी केला व तो यशस्वीही झाला. त्या व्यवस्थेचा सुसंगतवार अभ्यास होण्यासाठी व शिवकालीन व्यवस्थेपासून सद्यकालीन व्यवस्थेने बोध घेवून सर्वसामान्य माणसाला ही व्यवस्था ज्ञात व्हावी, यासाठी हा लेखन प्रपंच..!

ISBN 978-81-935968-0-7
9 788193 596807

₹ 150/-

आनंदमूर्ती
पब्लिकेशन